■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २९८ ■ बुधवार दि.१६ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 298 ■ Wednesday Dt.16 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# परळीतील महादेव मुंडे खून प्रकरण : दीड वर्षानंतर जागे झालेल्या विजयसिंह बांगरांवर प्रश्नचिन्ह?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरणात विजयसिंह बांगर यांना माहिती असूनही त्यांनी ती वेळेवर का उघड केली नाही ?

# शोकांतिका ! पोलिस अधीक्षक कार्यालय परिसरातच ज्ञानेश्वरी मुंडेंनी न्यायासाठी विष प्राशन केले

## विजयसिंह बांगर १८ महिन्यांनी बोलते का झाले? जनतेत संतापाचा सूर, आता बांगर बोलतायत, न्यायासाठी की स्वत:साठी?

बीड । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्हा तूफान चर्चेत आहे. संतोष देशमुखांच्या हत्येनंतर महादेव मुंडे खून प्रकरणात त्यांच्या कुटुंबियांकडून सातत्याने गंभीर आरोप केली जात आहेत. महादेव मुंडे खून प्रकरणाचा तपास हा एसआयटी किंवा सीआयडीच्या मार्फत व्हावा, अशी मागणी मुंडेंच्या कुटुंबियांची होती. महादेव मुंडेंच्या हत्येला १८ महिने पूर्ण झाली आहेत. मात्र, अजूनही समाधानकारक तपास झाला नसल्याचे कुटुंबियांचे म्हणणे आहे. त्यामध्येच आज कुटुंबिय आक्रमक झाले. पोलिस अधीक्षक कार्यालय परिसरातच ज्ञानेश्वरी मुंडे यांनी माध्यमांसमोरच काही वेळातच वैतागून





अचानकपणे विष प्राशन केल्याने परिसरात खळबळ उडाली. यावेळी ज्ञानेश्वरी मुंडे यांना बीड येथील शासकीय रुग्णालयात उपचार घेण्यासाठी भरती केले असून त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले आहेत.

१८ महिन्यांपूर्वी घडलेल्या महादेव मुंडे खून प्रकरणात तब्बल दीड वर्षानंतर विजयसिंह बांगर यांनी अचानक प्रतिक्रिया देत खळबळ उडवून दिली आहे. परंतु त्यांच्या या उशिरा जागृतीवर अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, प्रश्न उपस्थित केला जात आहे की इतके दिवस बांगर गप्प का होते?महादेव मुंडे यांचा निर्घृण खून झाल्यानंतर त्याच्या निषेधार्थ अनेकांनी आवाज उठवला होता. परंतु या गंभीर प्रकरणावर बांगर यांनी त्यावेळी मौन का पाळले? आता अचानक







त्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत, त्यामुळे त्यामागे राजकीय हेतू असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे. स्थानिक नागरीकांचा आरोप आहे की, जेव्हा गरज होती तेव्हा बांगर गप्प होते, आणि आता सहानुभूती मिळवण्यासाठी ते आवाज उठवत आहेत. या प्रकरणात पोलिस तपासही संथ गतीने सुरू असून, अद्याप मुख्य सूत्रधार मोकाट असल्याचे सांगितले आहे. महादेव मुंडे यांच्या कुटुंबियांनी वारंवार न्यायाची मागणी केली असतानाही बांगर यांनी तेव्हा का पुढाकार घेतला नाही, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. यामुळे त्यांच्या सद्य कृतीवर राजकीय स्टंटचा ठपका लागतो का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. विजयसिंह बांगर यांनी अचानक या प्रकरणावर प्रतिक्रिया देत राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आणले आहे. दीड वर्ष गप्प बसलेल्या बांगरांनी आता अचानक या मुद्द्यावर बोलणे सुरू केल्यामुळे नागरिक आणि कार्यकर्त्यांमध्ये संशयाची सल निर्माण झाली आहे. राजकीय लोकांचे मत आहे की, बांगर यांची प्रतिक्रिया ही निव्वळ राजकीय गणिताचा भाग आहे. दीड वर्ष शांत राहून आता सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न होत आहे. पीडित कुटुंब आणि सामान्य जनतेने वारंवार न्यायाची मागणी करताना जेव्हा खरे

पान २ वर

## संतोष देशमुख हत्या होणार असल्याचे विजयसिंह बांगरांना माहिती असूनही मौन का? जनतेत संशयाचे वातावरण!

संतोष देशमुख यांची हत्या होणार असल्याची माहिती विजयसिंह बांगर यांना आधीच होती, असा धक्कादायक खुलासा समोर येत आहे. जर ही माहिती त्यांना होती, तर त्यांनी वेळेत पोलीस किंवा संबंधित अधिकाऱ्यांना याची कल्पना का दिली नाही, असा थेट सवाल आता जनतेतून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणाने बीड जिल्ह्याचे वातावरण पुन्हा एकदा ढवळून निघाले आहे. एकीकडे संतोष देशमुख यांच्या हत्येने असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असताना, दुसरीकडे ही हत्या टाळता आली असती, अशी चर्चा रंगू लागली आहे. विशेष म्हणजे, बांगर यांनी एका खाजगी चर्चेत सरपंच संतोष देशमुख यांना धोका असल्याचे संकेत दिल्याचे सांगितले जात आहे. जर विजयसिंह बांगर यांना आधीच काहीतरी माहिती होती, तर त्यांनी ती अधिकृतपणे का उघड केली नाही? त्यांनी तात्काळ पोलिसांना कळवले असते, तर कदाचित एक जीव वाचला असता, असे मत संतोष देशमुख यांचे समर्थक व नातेवाईक व्यक्त करत आहेत.

या प्रकरणात बांगर यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, त्यांच्या या मौनाने अनेकांच्या मनात अस्वस्थता निर्माण झाली आहे. माहिती असूनही गप्प राहणं म्हणजे गुन्ह्याला साथ देणं नाही का? असा सवाल विचारला जात आहे. संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करून विजयसिंह बांगर यांनी हत्येपूर्वी काय माहिती मिळवली होती आणि त्यांनी ती का गुप्त ठेवली, याचा खुलासा करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## पिंपळनेर पोलिसांची वाळू माफियांवर कारवाई



बीड । प्रतिनिधी

सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी प्राप्त झाली की ताडसोना शिवारातील नदीपात्रात काही व्यक्ती जेसीबीच्या सहाय्याने वाळू उपसा करून ट्रॅक्टरद्वारे बेकायदेशीररीत्या चोरटी वाहतूक करत आहेत. सदर माहितीच्या अनुषंगाने सपोनि मधुसूदन घुगे, ग्रेड झडख ए.बी. शेळके, पो.शी. ८८७ सानप, पो.शी. २०२१ ढाकणे, पो.शी. १९०४ पिंपळे, पो.शी. १६३७ धोंडे यांनी पंचांसह दुपारी १४.३० वा. घटनास्थळी छापा टाकला.

पान २ वर

## केज शहरातील शासकीय कार्यालयाच्या आवारात खुलेआम मटका बुक्यांचा सुळसुळाट?

### एसपी साहेब, मटका बुक्यांच्या विरोधात विशेष मोहीम राबवा जेणेकरून कायदा व सुव्यवस्थेचा संपूर्ण परिसरात आदर राहील आणि सामान्य जनतेचा पोलिसांवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित होईल?

### पोलिस निरीक्षक उणवणे साहेब आपण नुसती बघ्याची भूमिका घेणार का?

केज । प्रतिनिधी

केज पंचायत समितीच्या आवारात खुलेआम मटका बुक्क्यांचा धुमाकूळ सुरू असून या सर्व प्रकाराला लोक त्रासून गेले आहेत. यामुळे अनेक संसार उध्वस्त झालेले आहेत. दररोज लाखो रुपयांच्या उघड उलाढाली होत असून पोलीस प्रशासन याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत आहे. मटका घेणाऱ्या व्यक्तीला कशाचीही भीती वाटत नाही. कायदा आणि सुव्यवस्थेचे केज शहरात धाबे दणाणले असल्याचे बोलले जात आहे. या सर्व प्रकाराला पोलिस प्रशासन आणि अधिकारी जबाबदार आहेत, अशी





उघड चर्चा रंगत आहे.

अजून कुणाच्या आशीर्वादाने हा सर्व प्रकार सुरू आहे. पोलिस प्रशासन, प्रशासकीय अधिकारी, की आणखीन

पान २ वर

### मटका बुक्यांचा खेळ बिनधास्त सुरू; पोलीस निरीक्षक उनवणे यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

केज शहरात मटका बुक्यांचा खेळ खुलेआम सुरू असून याकडे पोलीस निरीक्षक उनवणे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. शहरातील दिवसाढवळ्या मटका खेळ सुरू असल्याचे चित्र दिसून येते. विशेष म्हणजे, या अवैध धंद्यांची सर्व माहिती पोलिसांना असूनही कोणतीही ठोस कारवाई केली जात नसल्याचे नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. पोलीस निरीक्षक उनवणे यांच्या कार्यकाळातच या प्रकारांना ऊत आला असून, यामागे आर्थिक संलग्नतेचा संशय व्यक्त होत आहे. पंचायत समितीच्या कार्यासमोर भर दिवसा उघड्यावर मटका घेतला जातो याला आळा बसणार आहे की, नाही हे आता बघण्यासारखे ठरणार आहे. मटका बुक्यांच्या खेळामुळे अनेक युवक भरकटत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच मटका बुक्यांशी पोलिसांचे आर्थिक साटेलोटे आहे. महिन्याकाठी ठराविक रक्कम घेऊन कारवाई न करण्याची समजूत झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मटका बुक्यांवर त्वरित कारवाई करून पोलीस अधीक्षक उनवणे यांनी पारदर्शकता दाखवावी. अन्यथा त्यांच्यावरील संशय अधिक गडद होत जाईल. नागरिक आणि तरुण पिढीच्या भवितव्याशी खेळणाऱ्या मटका बुक्यांना थारा देणं कोणत्याही अधिकाऱ्याच्या जबाबदारीशी सुसंगत नाही.

## एखाद्या शेतकऱ्यांच्या नरडीचा घोट घेतल्यावर वनविभाग बिबट्याचा बंदोबस्त करणार का?

### वनपरिक्षेत्र अधिकारी हद्दीत नेमकं करतात तरी काय? चोभानिमगांवचे शेतकरी आता आंदोलनाच्या पावित्र्यात

आष्टी । प्रतिनिधी

बिबट्या मादीसह दोन बछड्यांना घेऊन दोन महिन्यांपासून मुक्कामी असल्याने परिसरातील शेतकरी भयभीत झाले आहेत. शेतीकामे करताना अनेकांच्या नजरेस हे दिसले आहे. संभाव्य धोका लक्षात घेऊन या बिबट्याचा बंदोबस्त करावा नसता गावकरी आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचे बोलले जात आहे. आष्टी तालुक्यातील चोभानिमगाव येथे ऊस शेती क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. या शेतीमध्ये गेल्या काही दिवसापासून नर व मादी बिबट्या आणि त्याचे दोन पिल्ले शेतकरी ग्रामस्थांच्या नजरेस पडत आहेत. अनेक दिवसापासून त्यांचा मुक्काम या भागात असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

दरम्यान, या परिसरामध्ये शेळ्या, वासरासह श्वानाचा फडशा पाडल्याची घटना घडली आहे. या बिबट्याचे दर्शन झालेल्या व्यक्तींमध्ये भीती निर्माण झाली आहे. शेतामध्ये काम करणारे कामगार मजूर, महिला, मुले भीतीमुळे शेतीत जाण्यास धजत नाहीत. शेतातील कांदा चाळमध्ये

पान २ वर

# गेवराई शहरात धान्यवाटप नाही, सर्व्हरचा अडथळामुळे लाभार्थींचे हाल!

## धान्य वितरण ठप्प; धन्य दुकानदारांकडून वेळेवर वाटप होत नसल्याच्या तक्रारीचा सूर

गेवराई । प्रतिनिधी

धान्य दुकानदारांकडून वेळेवर धान्य न मिळाल्याने, विशेषतः स्वस्त धान्य दुकानांमध्ये, लाभार्थी त्रस्त आहेत. अनेक ठिकाणी, ई-पॉस मशीनमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याने किंवा पुरवठा वेळेवर होत नसल्यामुळे धान्य वितरणात अडचणी येत आहेत, ज्यामुळे लाभार्थ्यांना वेळेवर धान्य मिळत नाही. ई-पॉस मशीनमध्ये तांत्रिक अडचणी, सर्व्हर डाऊन किंवा इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे धान्य वितरणामध्ये विलंब होतो, ज्यामुळे लाभार्थ्यांना वेळेवर धान्य मिळत नाही. अनेक ठिकाणी लाभार्थ्यांना धान्यासाठी तासनतास दुकानासमोर थांबावे लागते, ज्यामुळे त्यांची गैरसोय होते.



काही ठिकाणी, पुरवठा वेळेवर न मिळाल्याने किंवा साखरेसारख्या वस्तू उपलब्ध नसल्यामुळे लाभार्थी धान्यापासून वंचित राहतात. धान्य वितरणात अडचणी येत असल्याने, दुकानदारांनाही ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. शासनाच्या सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेअंतर्गत इंटरनेटच्या समस्येमुळे बायोमेट्रिक प्रणालीत अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे गेल्या आठवडाभरापासून धान्य वितरण ठप्प झाले आहे. परिणामी, लाभार्थींमध्ये तीव्र रोष निर्माण झालेला आहे, तर वारंवारच्या समस्येमुळे हैराण झालेल्या रेशन दुकानदार सातत्याने खाजगी कामात व्यस्त असतात मात्र किंचितही माल वाटपाकडे लक्ष्य देत नसल्याच्या तक्रारीचा सूर पाहायला मिळाला. रेशन दुकानदार यांना वेळेचे बंधन नसल्यामुळे शासकीय मान्यतेनुसार धान्य वाटपाच्या वेळेवर धान्यवाटप होणं गरजेचं असतं पण् गेवराई शहरातल्या अनेक धान्य वितरण करणाऱ्या दुकानदाराकडून नियमांचे उल्लंघन केलं जात असल्याचे निदर्शनात येत आहे.

शासकीय पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्यामुळें दुकानदारावर वचक राहिला नाही ग्राहकांना तासन्तास बाहेर उभा करत वाटप करणारा आला नाही सर्वर चालत नाही असे कारणे देत दुकानदार चालढकल करत असल्याचे सांगितले जाते. या सर्व बाबीकडे गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांनी आतापर्यंत कुठल्या धान्य दुकानदाराची पाहणी केलीय का? असा सवाल ग्राहकांकडून केला जात आहे या प्रकरणाकडे जिल्हा पुरवठा विभागाने लक्ष घालावे अशी मागणी होत आहे.

# गेवराई शहरात न.प.ने फुले दाम्पत्याचे अर्धाकृती पुतळे बसविण्याची फुले प्रेमी नागरिकांची मागणी

गेवराई । प्रतिनिधी

क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे न.प.ने गेवराई शहरात अर्धाकृती पुतळे बसवून भव्यदिव्य स्मारक तयार करावे अशी मागणी गेवराई शहरासह तालुक्यातील माळी समाज बांधव तसेच फुले प्रेमी नागरिकांनी केली आहे.

न.प.कार्यालयासमोरील जागेत अथवा योग्य ठिकाणी जागा आरक्षित करून फुले दाम्पत्याचा सन्मान करण्यात यावा अशी मागणी देखील करण्यात येऊ लागली आहे. महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष बापू गाडेकर व सावता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी यांनी देखील प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकारद्वारे हि मागणी केली आहे.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याची स्थापना करण्याची मागणी योग्य असून त्यांचे कार्य आणि योगदान खूप मोठे आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव करणे महत्वाचे आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजासाठी खूप मोठे कार्य केलेले आहे. त्यांनी शिक्षणाचे महत्व लोकांना समजावून सांगितले आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे समाजात समानता आणि न्यायाचे महत्व वाढले आहे. त्यामुळे त्यांचे स्मरण म्हणून अर्धाकृती पुतळा बसवणे महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्रातील फुले दांपत्य एक थोर समाजसुधारक होते. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी आणि समाजातील जातिभेद दूर करण्यासाठी खूप मोठे कार्य केले. गेवराई शहरात फुले दांपत्याचा पुतळा बसविणे म्हणजे गेवराई शहराच्या वैभवात भर टाकण्यासारखे आहे. स्त्री शिक्षण, शेतकरी हक्क व सामाजिक समतेसाठी आयुष्य वाहून घेणाऱ्या फुले दांपत्याच्या स्मारकाची आजतागायत लोकप्रतिनिधींना अथवा इतर कोणालाही साधी कल्पना सुद्धा सुचली नाही. महात्मा फुले आणि सावित्रीबाईंचा अर्धाकृती पुतळा नगरपरिषदेच्या माध्यमातून जागा उपलब्ध करून उभारण्यात यावा अशी मागणी समस्त माळी समाजासह फुले प्रेमी लोकांकडून होऊ लागली आहे.




# राशन माफियाच्या घरातूनच पुरवठा विभागाचा पंचनामा

## होळ येथील धक्कादायक प्रकार; पुरवठा विभाग 'मॅनेज' असल्याचा ग्रामस्थांचा आरोप

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळ येथील उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या राशन दुकानातून काळ्या बाजारात जात असलेले ४४ क्विंटल स्वस्त धान्य धारूर पोलिसांनी पकडले. त्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या आदेशा नंतर खडबडून जागे झालेल्या केजच्या पुरवठा विभागाच्या तपासणी पथकाने चक्क राशनमाफियाच्या घरात बसूनच पंचनामा केल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. या प्रकारामुळे कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.



होळ येथील स्वस्त धान्याचा काळाबाजार धारूरमध्ये उघडकीस आला. उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या कोलंबस सहकारी संस्थे अंतर्गत त्यांचा भाऊ अशोक तुकाराम घुगे हा राशन दुकान चालवतो. त्याने राशनचे धान्य काळ्या बाजारात विक्री साठी पाठवल्याची कबुली वाहन चालकाने दिली. तसा धारूर पोलिसांनी पुरवठा विभागाला अहवाल दिला आहे. या पार्श्वभूमी वर राशन दुकानाची केजच्या तालुका पुरवठा विभागाकडून तपासणी करण्यात आली. या पथकात तालुकापुरवठा निरीक्षण अधिकारी सुजाता मेश्राम, श्रीमती उंबरे, मंडळ अधिकारी संतोष देशमुख, तलाठी नामदेव उगले यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. मात्र पंचनामा करण्या साठी संबंधित दुकानात न जाता, त्यांनी थेट राशन माफियाच्या घरातच बसून पंचनामा सुरू केला. ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी केज तहसीलदारांना कळवले तहसीलदारांनी त्वरित हस्तक्षेप करत पथका तील अधिकाऱ्यांना खडसावले. त्यानंतर दुकानात बसूनपंचनामा पूर्ण करण्यात आला. या संपूर्ण प्रकारामुळे होळ येथील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गोंधळ पुन्हा एकदा उघड झाला असून, जिल्हाधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

### माफियांच्या समोर खरे जवाब आलेच नाहीत!

पंचनाम्यासाठी राशन माफियाच्या नातेवाईकांसह काही नागरिकांना घरासमोर बोलावून त्यांच्या जबाब नोंदवण्यात आले.एकूण २३ जणांचे जबाब घेण्यात आले असलेतरी दबावाच्या वातावरणा मुळे अनेकांना खरी माहिती देता आली नाही,अशी चर्चा ग्रामस्थांत सुरू आहे. त्यामुळे तहसीलदारांनी तहसीलमध्ये जवाब घ्यावेत अशी मागणी ग्रामस्थांमधून केली जाणार आहे.

राशन दुकानदाराच्या घरात बसून पंचनामा केला जात असल्याचा आरोप होता.त्या अनुषंगाने तहसील दारांना कळविले आहे. योग्य ती कार्यवाही केली जाईल.

**– शिवकुमार स्वामी,**
प्र.जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड

माझ्याकडे राशन दुकानदाराच्या घराचा व्हिडिओ आला. त्या नंतर अधिकाऱ्यांना तात्काळ दुकानातूनच पंचनामा करण्याच्या सूचना केल्या. पारदर्शक पद्धतीने चौकशी करू.

**–राकेश गिड्डे,** तहसीलदार, केज

# धारूर येथील मस्जिदची इनामी जमीन लाटणाऱ्या भूमाफिया असद कुरेशी यांना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांची नोटीस

धारूर । प्रतिनिधी

धारूर येथील सर्वे नंबर ५५६, ६१० मस्जिदची इनामी जमीनीची अवैधरीत्या खरेदी विक्री करणारा धारूर येथील भूमाफिया आसद जिलानी कुरेशी यांना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी नोटीस देऊन सात दिवसांमध्ये खुलासा सादर करण्याचे आदेश दिले, जर सात दिवसांमध्ये खुलासा सादर नाही केल्यास त्यांच्याविरुद्ध फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल का करण्यात येऊ नये असे आदेश देण्यात आले. धारूर येथील समस्त मस्जिदची खीदमतमाश इनाम जमीन सर्वे नंबर ५५६ व ६१० खरेदी विक्री नोटरी बॉण्ड वरती केल्यामुळे व वक्फ बोर्डचे मुख्य अधिकारी यांनी तात्काळ खुलासा सादर करण्याचे आदेश दिले व खुलासा सादर नाही केल्या तर त्यांच्याविरुद्ध फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल होणार आहे असे आदेश दिले आहे. असद कुरेशी व त्यांच्या साथीदारां मार्फत खूप लोकांच्या जमिनी लाटणे लोकांच्या जमिनीवरती ताबा करणे तसेच गोरगरिबांच्या



नावे असणारी जमीन व मुक्तियार पत्र आधारे बॉण्डवर लिहून घेऊन दुसऱ्या व्यक्तींचे तक्रारी करणे तसेच धारूर शहरांमध्ये सुधीर कोमटवार यांच्या संपूर्ण जमिनीवर गावगुंडांना सोबत पत्र्याचे कंपाउंड मारून बेकायदेशीर ताबा घेण्याच प्रयत्न केल्यामुळे धारूर शहरामध्ये हिंदू मुस्लिम सारखा प्रकार केला होता व धारूर शहराचं वातावरण खराब करणारा असद कुरेशी व त्यांच्या गँग यांच्यावरती सामूहिक गुन्हेगारीचे अनेक गुन्हे धारूर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये दाखल आहोत. धारूर शहरातील प्रतिष्ठित अल्पसंख्यांक इत्यादी समाजांच्या लोकांना जाणीवपूर्वक पैशाच्या अमिषापोटी ब्लॅकमेलिंग करण्यासाठी लोकांच्या विरुद्ध तक्रार देण्याचा पराक्रम असद कुरेशी व त्यांच्या साथीदाराने केला आहे, बीड जिल्ह्यातील सर्व कार्यालयांमध्ये बेकायदेशीर तक्रारी देऊन पैशाचे मागणी करण्याचा उद्रेक या असद कुरेशी व त्यांच्या साथीदाराने केला आहे.

तसेच असद कुरेशी यांच्या स्वतःकडे वहीतीसाठी दिलेली इनामी जमीन ही दादागिरी आणि गुंडगिरीच्या जोरावरती ताबा करून बसला आहे. या प्रकरणामध्ये सुप्रीम कोर्टाने निकाल आहे परंतु हा दादागिरीच्या जोरावर जमिनीचे ताबा सोडत नाही तरी याप्रकरणी तात्काळच पोलीस अधीक्षक बीड हे कारवाई करणार आहेत. धारूर शहर व बीड जिल्ह्यामध्ये ब्लॅकमेलिंग करून कित्येक लोकांच्या जमिनी हडप केले आहेत. या संदर्भात गोपनीय शाखेमार्फत माहिती घेणार असल्याची माहिती मिळत आहे व लवकरच यांच्यावरती सामूहिक गुन्हेगारी संदर्भातला गुन्हा दाखल करून हद्दपारची कारवाई होण्याची संकेत आहे या प्रकरणाकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



# परळी तालुक्यातील ९० ग्रा.पं. सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मुदत संपलेल्या ९० ग्रामपंचायतच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत मंगळवार दि.१५ जुलै रोजी तहसील कार्यालयात जाहीर करण्यात आली.

परळी तहसील कार्यालयात सोडत पद्धतीने जाहीर झालेले हे आरक्षण उपविभागीय कार्यालयाचे चे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर व तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी जाहीर केले. यात ९० पैकी ५० ग्रामपंचायतीची खुल्या राहिल्या असून अनुसूचित जातीसाठी १५ त्यापैकी आठ महिलांसाठी अनुसूचित जमातीसाठी १ व नागरिकाच्या मागास वर्गातील सरपंच पदासाठी २४ ग्रामपंचायती राखीव झाले आहेत.

# माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप

दौलावडगाव । प्रतिनिधी

माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त निमित्त सामाजिक उपक्रमाव्दारे तालुक्यातील पाटण येथील सामाजिक कार्यकर्ते सोमीनाथ वनवे यांनी पाटण सांगवी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करुन धनंजय मुंडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा केला.

यावेळी सरपंच दादासाहेब जगताप, शरद वनवे, मारुती वनवे, संतोष वनवे, बाळू वनवे, केशव वनवे, प्रवीण खंडागळे, किशोर वनवे याच्यासह अनेकजण उपस्थित होते.



## श्री संत शिरोमणी सावता महाराज आणि विठ्ठल रुक्माई यांच्या मूर्ती स्थापनेच्या निमित्ताने

# विविध धार्मिक कार्यक्रम आणि महाप्रसादाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

बीड शहर आणि पंचक्रोशीतील तमाम जनतेस कळविण्यात येते की कर्मयोगी श्री संत शिरोमणी सावता महाराज आणि विठ्ठल रुक्माई यांच्या मूर्ती स्थापनेच्या निमित्ताने बीड मधील मोंढा रोड, सावता माळी चौक येथे (बिंदुसरा नदीच्या पश्चिमेला) भव्य असे सावता प्रतिष्ठान उभारण्यात आले असून तारीख १८ जुलै शुक्रवार रोजी सकाळी साडेसात ते दुपारी तीन वाजेपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वांनी याचा लाभ घ्यावा, ही विनंती. प्राध्यापक लक्ष्मण गुंजाळ यांनी केले आहे.



पान १ वरून...

### शोकांतिका ! पोलिस अधीक्षक कार्यालय परिसरातच...

पाठबळ हवे होते, तेव्हा नेत्यांचा पाठिंबा मिळाला नाही, ही बाब जनतेच्या मनात खोलवर रुतली आहे. त्यामुळे आता दिल्या जाणाऱ्या वक्तव्यांना कोणी गांभीर्याने घेत नाही, हे वास्तव लक्षात घेणे गरजेचे आहे.

विजयसिंह बांगर यांनी मौन सोडले आहे. त्यांच्या या उशिरा आलेल्या प्रतिक्रियेमुळे स्थानिक जनतेत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. जेव्हा न्यायाची खरी गरज होती, तेव्हा बांगर कुठे होते? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. महादेव मुंडे यांचा खून हे केवळ एक गुन्हेगारी प्रकरण नसून, सामाजिक अस्वस्थतेचे प्रतीक ठरले होते. अनेक सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, आणि सामान्य जनतेने त्या काळात आवाज उठवला. मात्र, विजयसिंह बांगर यांचा त्या काळात कुठलाही सहभाग दिसून आला नव्हता. आता दीड वर्षांनी अचानक त्यांची 'जाग' येते, यामागे राजकीय समीकरणांचा भाग असल्याचे दिसून येत आहे.

### पिंपळनेर पोलिसांची वाळू माफियांवर कारवाई

कारवाई दरम्यान जेसीबी मालक दत्ता नवनाथ घरबुडे, रा. वडवणी हा घटनास्थळी मिळून आला. सदर ठिकाणी एक जेसीबी, एक ट्रॅक्टर, दोन ट्रॉली असा एकूण रुपये ३८,००,०००/- (अक्षरी रुपये अडतीस लक्ष फक्त) किंमतीचा मुद्देमाल मिळून आला आहे. कारवाईदरम्यान ट्रॅक्टर चालकांनी पोलीस व पंच यांना पाहून ट्रॅक्टर ट्रॉलीतील वाळू जागीच खाली फेकून चार आरोपी एक ट्रॅक्टर हेडसह पसार झाले आहेत. सदर प्रकरणी बेकायदेशीर वाळू उपसा व वाहतुकीबाबत आवश्यक गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस स्टेशन पिंपळनेर यांच्या पथकाद्वारे करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनात करण्यात आली आहे.

### केज शहरातील शासकीय कार्यालयाच्या आवारात...

कुणी? मटका घेणाऱ्या व्यक्ती बिनधास्तपणे वावरत असून त्यांच्या पाठीमागे अशी कोणती टाकत आहे की, ज्यामुळे ते खुलेआम मटका बुक्क्यांचा धंदा केज शहरात, त्यातल्यात्यात प्रशासकीय कार्यालयाच्या आवारात बिनधास्त चालवतात. या सर्व प्रकाराला कुठेतरी पोलीस प्रशासन तर पाठीशी घालत नाही ना? अशी उघड चर्चा सुरू आहे. आपल्या माध्यमातून कडक कारवाई कधी होणार? याकडे आता सगळ्या तालुक्याचे लक्ष लागलेले असून पोलीस प्रशासन यावर काय ॲक्शन घेणार हे पाहण्यासारखे ठरणार आहे.

### पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी लक्ष घालणे गरजेचे!

केज शहरात सध्या मटका बुक्यांचा अवैध धंदा उघडपणे सुरू असून स्थानिक पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. पोलीस निरीक्षक उनवणे यांच्या कार्यकाळात या अवैध धंद्यांना बळ मिळाले असून, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे. स्थानिक पातळीवर पोलीस कारवाई करत नसल्याने हे अवैध धंदे अधिक बळकट होत आहेत. मटका जुगारामुळे युवकांची भविष्ये अंधकारमय होत आहेत, कुटुंब उध्वस्त होत आहेत, हे वास्तव नाकारता येणार नाही. पोलिस निरीक्षक उनवणे यांच्याकडून जर जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असेल, तर त्यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करणे, तसेच जबाबदारी निश्चित करणे हे पोलीस अधीक्षकांचे कर्तव्य ठरते. नागरिकांची मागणी स्पष्ट आहे. मटका बुक्यांवर कारवाई झाली पाहिजे आणि दोषींवर कठोर पावले उचलली पाहिजेत. अन्यथा, जनतेचा संयम सुटू शकतो? केज शहरातील मटक्याच्या खेळामध्ये बीड रोड येथील स्वागत बीअर बार शेजारी चहाच्या टपरीमध्ये खुलेआम मटका बुक्क्यांचा धंदा चालतो. हे पोलीस निरीक्षक उनवणे साहेबांच्या लक्षात येत नसेल काय? त्याचप्रमाणे कानडी रोडला विद्यार्थी खाजगी क्लासेससाठी येतात. त्या ठिकाणी देखील बिनधास्त मटक्याचा धंदा चालतो. विद्यार्थ्यांनी या सर्व प्रकाराला कुठल्या दृष्टिकोनातून बघायचे. हा सर्व प्रकार थांबला पाहिजे यासाठी सर्व सामाजिक कार्यकर्ते व संघटना एकत्र येणार असल्याची चर्चा जोर धरून आहे.

### एखाद्या शेतकऱ्यांच्या नरडीचा घोट घेतल्यावर...

हे बिबट्या आणि त्यांचे पिल्ले येतात. चोभा निमगाव गावच्या शेतीमध्ये हा बिबट्या आणि त्याची पिल्ले वावरत असल्याची सर्वत्र चर्चा असून या शेतीतील कांदा चाळमध्ये रात्री हा बिबट्या आणि पिल्ले आश्रयाला येतात. या संदर्भात ग्रामस्थांनी वन विभागातील कर्मचाऱ्यांना ही माहिती दिलेली आहे. वन विभागाने याची तात्काळ दखल घेऊन दुर्दैवी प्रकार घडण्या अगोदरच यातून शेतकरी, कामगार आणि शेतकऱ्यांच्या विविध जनावरे, शेळी यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत अशी मागणी चोभानिमगांव येथील माजी जिल्हा परिषद सदस्य प्रगतशील शेतकरी सतीश झगडे यांच्यासह ग्रामस्थ शेतकऱ्यांनी केली आहे.

### दुर्दैवी घटना घडल्यास मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करायला हवा!

वनविभागाला वारंवार सांगून देखील या परिसरात वावर असलेल्या मादीसह दोन पिलांचा व बिबट्याचा बंदोबस्त वनविभागाला करता येत नाही. जर याच दरम्यान एखादी दुर्दैवी घटना हद्दीत घडली तर सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून कारभार पाहत असलेल्या अधिकाऱ्यांवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करायला हवा असे शेतकऱ्यांसह नागरिकातून बोलले जात आहे.

## गेल्या अनेक वर्षापासून बंद असलेली बस सेवा सुरु, शेतकरी नेते जगदिश फरताडे व कवडगाव ग्रामस्थांच्या मागणीला यश

# माजलगाव ते बीड मार्गे देवडी कवडगाव ई-बससेवा सुरू

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव देवडी भागातील जवळपास २० ते २५ गावांना बीड व माजलगावला जाण्यासाठी बससेवा सुरू नव्हती पर्यायाने या भागातील जनतेला जिल्हा आणि तालुक्याच्या ठिकाणी अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमधुन प्रवास करावा लागत होता ही बाब लक्षात घेऊन या भागातील शेतकरी चळवळीचे नेते जगदिश फरताडे व कवडगावचे सरपंच शे.बशीरभाई यांच्या शिष्टमंडळाने विभागीय नियंत्रक अनुजा दुसाने व बीड आगारप्रमुख संतोष डोके यांची प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदन देण्यात आले होते याच मागणीची दखल घेऊन या मार्गावर दि.१५ पासुन माजलगाव ते बीड मार्गे देवडी कवडगाव पिंपळनेर ई-बससेवा सुरू झाली आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की वडवणी तालुक्यातील जवळपास २० ते २५ गावांना जिल्हा आणि तालुक्यातील ठिकाणी जाण्यासाठी दळणवळणाची कुठलीच सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना त्रास सहन




करावा लागत होता त्यामुळे गेल्या कित्येक दिवसांपासून या भागातील जनतेला बससेवा सुरू असणे ही गरज बनली होती बीड ते माजलगाव मार्गावर बीड पासुन ते माजलगाव पर्यंत अंथरवन पिंपरी तांडा नागापुर जवळा म्हाळसापुर ईट पिंपळनेर सांडरवण मुगगाव पाटेगाव सुरडी नबाबपुर बोरदेवी लिंबारुई मोरेवाडी कवडगाव देवडी ख.लिमगाव काडी वडगाव देवगाव खापर वाडी परडी माटेगाव लवुळ पात्रुड ढोरगाव अशी जवळपास २० ते २५ गावांना या बसचा फायदा होऊन दळणवळणाचे साधन उपलब्ध झाले आहे मात्र याच बसच्या फेऱ्या वाढविण्यात याव्यात अशी मागणी प्रवाशी जनतुन होत आहे.

भविष्यात आपण या बसच्या फेऱ्या निश्चितच वाढवु असे आश्वासन विभागीय उपनियंत्रक महाजन यांनी दिले ही बससेवा सुरू झाल्यानंतर प्रवाशांत आनंदाचे वातावरण पसरले आहे बस गावात आल्यानंतर कवडगाव देवडी येथील जनतेने चालक वाहक यांचा यथोचित सत्कार केला. ही बससेवा सुरू करण्यासाठी शेतकरी चळवळीचे नेते जगदिश फरताडे, कवडगावचे सरपंच शे.बशीरभाई, माजी सरपंच मकसुदखान पठाण, माजी सरपंच सुभाषराव साळवे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष शेरु पटेल, ग्रा पं सदस्य मकसुद पटेल, दगडु कानडे, बन्शीआप्पा लेंडाळ, आदेश नांदुरकर, मुदस्सरअली जहागीरदार, शिवसेना गटनेते बाबासाहेब राऊत, आशेफभाई इनामदार, नरेंद्र काळे पाटील, आबेद इनामदार, देवीचे सरपंच अतुल झाटे, मच्छींद्रबप्पा झाटे, विश्वनाथ दादा झाटे, विश्वासराव आगे, भगवानराव कांबळे, गितेशदादा आगे, काडीवडगावचे सरपंच बालासाहेब राऊत, राजाभाऊ बादाडे, पुरुषोत्तम गिलबिले, मोरेवाडीचे सरपंच लहदादा काळे, सुर्डीचे सरपंच बाबुराव मोरे, बोर देवीचे सरपंच रविंद्र आडसुळ, शत्रुघ्न डोंगरे, परमेश्वर थोटे, सुनिल दुबाले आदिनी प्रयत्न केले.

# दुधाची उधारी मागितल्यामुळे केलेल्या जाती वाचक गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

बीड | प्रतिनिधी

राखी वालेकर आणि इतर दोन महिलांचे कुटुंब महासांगवी ता पाटोदा येथे ऊस तोडीसाठी आले होते. तेथे ते कोप्या बांधून राहत होते. सदर महिला आरोपी अशोक गर्जे रा. महासांगवी ता. पाटोदा याचेकडून उधारीवर दूध घेत होत्या. आरोपी अशोक रामराव गर्जे आरोपी ने उधारी चे पैसे मागितले यांच्यावर जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून सदर गुन्हा दाखल करण्यात आला होता त्यातून त्याची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

या घटनेची हकीगत अशी आहे की, दि.१३/४/२०२२ रोजी संध्याकाळी साडेसहा वाजण्याचे सुमारास आम्ही कोप्या जवळ असताना महासांगवी येथील मठा जवळ रहणारा अशोक रामराव गर्जे रा महा सांगवी ता पाटोदा जिल्हा बिड हा दारू पिरूनव म्हणाला की आमचे दुधाचे पैसे द्या असे म्हणाला. त्यानंतर मी त्यास म्हणाले की, तुमच्या दुधाचे पैसे आमचे मालक आल्यावर देऊ असे म्हणतात अशोक गरजे यांनी मला दुधाचे पैसे दे असे म्हणून शिवीगाळ करून पूजे पायाच्या करंगळीवर दगड मारला त्यानंतर माझ्या घराजवळ राहणारी लक्ष्मी बगाडे व जया दादा मोरे व जानवी दादा मोरे ह्या तिथे आल्या सदर अशोक यांनी कमरेवर लाथा मारल्या लाथ आणि मारहाण केली व डोक्याचे केस धरून ओढले व आम्हा सर्वांना मनाला की मग त्यांना व आम्हाला सर्वांना जातीवाचक शिवीगाळ केली याबद्दल फिर्यादीने पोलीस स्टेशन पाटोदा येथील सर फिर्याद दाखल केली पूर्ण प्यार सदर फिर्यादीप्रमाणे गुन्हा आरोपीच्या विरुद्ध गुन्हा नोंदवून घेऊन त्याचा तपास तत्कालीन पोलीस उपाधीक्षक धाराशिवकर यांच्याकडे वर्ग करण्यात आला पूर्ण असे मत करसहफिर्यादी व जया दादा मोरे राहणार तेलंगशी तालुका जामखेड व लक्ष्मी हनुमंत बगाडे राहणार पाटोदा ह्या एका टोळीत असून आपापल्या कोप्या जवळ रहात होत्या. त्यावेळी आरोपी अशोक दुधाचे पैसे मागण्यासाठी दारू पिउन आमच्या कोण्या जवळ फिर्यादी कडे आला व त्याने दुधाचे पैश्याची मागणी केली. त्यावेळी फिर्यादी त्याला म्हणाली मालक आल्यावर देवुत त्यावेळी आरोपी अशोक रामराव गर्जे यांचे विरुद्ध फिर्यादीने फिर्याद दिली होती. आरोपी हा आमच्या कोप्या जवळ दारू पिऊन आला व त्याने दुधाचे पैसे मागितले. त्यावेळी फिर्यादी पैसे मालक आल्यानंतर देऊ असे म्हणाली त्यामुळे आरोपीने फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करून तिचे उजवे पायाच्या करंगळीवर दगड मारला, त्यावेळी फिर्यादीचे कोपी शेजारी कोपी असलेली लक्ष्मी बगाडे व जया दादा मोरे व त्यांची मुलगी जानवी दादा मोरे तिथे आल्या व आरोपीने त्यांच्या डोक्याचे केस धरून ओढले, लाथाबुक यांनी महाराज केली व जातीवाचक शिवीगाळ करून दुधाचे पैसे देता येत नसतील तर कशाला धंदा करता असे आरोपीने म्हणाल्याने ते सांगून त्याचे विरुद्ध आय पी सी चे कलम ३२३ २९४ ५०४ ३(।), सीआरपीसी चे कलम ३ (२) नुसार गुन्हा दाखल केला.

या गुणाची चौकशी करून पोलीस उपाधीक्षक धाराशिवकर यांची यांनी चौकशी करून आरोपी विरुद्ध आरोप पत्र दाखल केले ३२४,३२३ २९४ कायदा चे कलम ३(१) (ी) (ी) व (२)(ीं) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या केसची सुनावणी अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश पाटवदकर साहेब यांचे समोर झाली सदर केस मध्ये फिर्यादी व पाच साक्षीदार तपासले तथापी सुनावणी नंतर आरोपी अशोक गर्जे राहणार महासांगवी ता पाटोदा जी बीड यांची जातिवाचक गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात आली या केस मध्ये आरोपीतर्फे ॲड संगीता क्षीरसागर (धसे) यांनी परिश्रम घेतले व त्यांना ॲड देशपांडे आणि ॲड सय्यद यांनी सहकार्य केले.





## धारूरच्या महादुर्गाचे काम तात्काळ सुरू करा अन्यथा उपोषण करणार : जागर प्रतिष्ठानचा इशारा

पात्रुड | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक शहर असणाऱ्या धारूर येथील महादुर्ग किल्ल्याच्या भिंती पूर्णपणे ढासळलेल्या आहेत. वारंवार पाठपुरावा करून देखील प्रशासन दखल घेत नसल्याने जागर प्रतिष्ठान ने आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गेल्या एक वर्षापासून जागर प्रतिष्ठान धारूर किल्ल्याच्या भिंतीची पुनर्बांधणी सोबत किल्ल्यात सीसीटीव्ही कॅमेरा बसवणे सुरक्षा रक्षक वाढवणे अतिक्रमण हटवणे यासाठी पाठपुरावा करत आहे परंतु पुरातत्व विभाग आणि प्रशासन किल्ल्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते त्यामुळेच येत्या पंधरा दिवसात मागण्यांचा विचार न केल्यास जागर प्रतिष्ठानच्या वतीने उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

जागर प्रतिष्ठानच्या वतीने आपल्या मागण्यांचे निवेदन तहसील कार्यालय किल्ले धारुर येथे देण्यात आले. त्यावेळी जागर प्रतिष्ठान चे विशाल जाधव, रोहित गायकवाड, संदीप शिंगारे, अशोक गायके, अनुभव शेंडगे, कृष्णा शेंडगे, योगेश अंधारे, गोरख चव्हाण, राहुल तांबवे, आदिनाथ शिंदे, महेश चव्हाण, मनोज गव्हाणे, अशोक गव्हाणे, चेतन गोंडने, दादा फरतडे, सचिन सोनटक्के, ओम सावंत आदी शिलेदार उपस्थित होते.

## केज तालुक्यात ११४ ग्रामपंचायतीचे सरपंच पदासाठी २०२५-२०३० आरक्षण जाहीर

केज | प्रतिनिधी

ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी सन २०२५-२०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी आरक्षणाची सोडत दिनांक १५ जुलै २०२५ रोजी केज तहसील कार्यालयात जाहीर करण्यात आली. या आरक्षण सोडतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांना विशेष संधी देण्यात आली आहे. या आरक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून एकूण ग्रामपंचायतींपैकी प्रत्येक प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणाचे गावनिहाय वितरण पुढीलप्रमाणे आहे.

अनुसूचित जाती (एस. सी)महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती: मांगवडगाव, इस्थळ, मोटेगाव, साळेगाव, हनुमंत पिंप्री, मस्साजोग, लाख, बोरीसावगाव, सादोळा सर्वसाधारण (एस. सी.खुला) प्रवर्गासाठी: सारुळ, कोल्हेवाडी, धनेगाव, सौंदना, उंदरी, वरपगाव/कापरेवाडी, जवळबन, सोनिजवळा, लाव्हूरी अनुसूचित जमाती (एस. टी)महिलांसाठी आरक्षित:ढाकेफळ सर्वसाधारण प्रवर्गासाठी:धोतरा नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओ. बी.सी)महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती:जोला, मुलेगाव, पिसेगाव, पिटीघाट, शेलगाव गांजी, सातेफळ, लिंबाचीवाडी, केकानवाडी, सोनेसांगवी, येवता, रामेश्वरवाडी/ढाकंनवाडी, कौडगाव, पाथरा, सावळेश्वर, बोबडेवाडी, नांदुरघाट नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण प्रवर्गासाठी(ओ. बी.सी) :आरणगाव, भाटुंबा, भोपला, दरडवाडी, डोका, काशीदवाडी, शिंदे, चिंचोलीमाळी, नाव्होली, लाडेवडगाव, पैठण, दहिफळ (वड), माळेगाव, बावची

सर्वसाधारण प्रवर्ग (ओपन)महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती:लाडेगाव, कानडी माळी, कोठी, बोरगाव बुद्रुक, तरनळी, काळेगाव घाट, बनसारोळा, भालगाव, विडा/ गौरवाडी, कासरी, आवसगाव/वाकडी, पिंपळगव्हाण, हदगाव, माळेवाडी, दिपेवडगाव, कानडी बदन, कुंभेफळ, सुकळी, वाघेबाभळगाव, बानेगाव, नागझरी, सासुरा, डोनगाव, मुंडेवाडी, पिराचीवाडी, दैठणा, केकत सारणी, कोरेगाव, पळसखेडा, शिरपुरा, उमरी

खुल्या ( ओपन) प्रवर्गासाठी:गोटेगाव, जाधव जवळा, साबला, युसुफ वडगाव, होळ, बनकरंजा, येकुरका, तांबवा, आनंदगाव, केवड, सारणी आनंदगाव, सूर्डी, शिरूर घाट/ गदळेवाडी, औरंगपूर, चंदन सावरगाव, केळगाव/बेलगाव, जानेगाव, धर्माळा, देवगाव, कोरडेवाडी, आनेगाव, राजेगाव, टाकळी, सांगवी (आ), आंधळेवाडी, जिवाचीवाडी/ तुकुचीवाडी, घाटेवाडी, नारेवाडी, आडस, सांरणी (आ), नायगाव इत्यादी ग्रामपंचायती असून आरक्षणाची ही प्रक्रिया शासनाच्या निर्देशानुसार पारदर्शक आणि संगणकीय प्रणालीद्वारे सोडतीच्या माध्यमातून पार पडली. ग्रामीण भागातील महिलांना नेतृत्व संधी देणारे हे आरक्षण भविष्यातील ग्रामविकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

## जतीन शेख चे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

कोल्हापूर | प्रतिनिधी



राज्य सरकारकडून दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. गेल्या काही वर्षांत जिल्हा परिषद व महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी शासनातर्फे आयोजित शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून तयारी करणार्या विद्यार्थ्यांनी उच्च गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. अभ्यासासाठी मर्यादित साधने असूनही या जतीनने अथक मेहनतीच्या जोरावर यशाचे शिखर गाठले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी २०२५ (पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती) चा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून त्यामध्ये कोल्हापूर महानगरपालिकेच्या महात्मा फुले विद्यालय फुलेवाडी या शाळेचा विद्यार्थी जतीन जाहेर शेख याने ३०० पैकी २५४ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शिष्यवृत्तीस पात्र ठरला आहे. त्याला कुलदीप जठार, सागर संकपाळ सर व त्याचे आईवडील यांचे मार्गदर्शन लाभले तर मुख्याध्यापिका सौ.अनुराधा शिंत्रे मॅडम यांची प्रेरणा मिळाली.

## ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या सुशोभीकरणासाठी कनिज़ फातेमा यांच्याकडून वृक्षदान

बीड | प्रतिनिधी




शहरातील मिल्लिया प्राथमिक शाळेच्या (मुलींची) मुख्याध्यापिका मिर्झा कनिज़ फातेमा यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या सुशोभीकरणासाठी वृक्षदान केले. यामुळे या ऐतिहासिक वास्तूसाठी आता महिला मुख्याध्यापिका सुद्धा सरसावल्याचे दिसून आले असले तरी बीड नगर परिषद आणि जिल्हा प्रशासन अजूनही कार्य शून्य असल्याचेच दिसत आहे.

मुख्याध्यापिका कनिज़ फातेमा यांच्या इच्छेनुसार त्यांचा वाढदिवस ऐतिहासिक कारंजा टॉवर समोर वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष झुंजार धांडे, हाजी तालेब पटेल, मधुकर धांडे, शेख वसीम, ख़िज़र खान, रिज़वान खान, शहिंशाह खान यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तर प्रमुख पाहुणे म्हणून ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण व्हावे याकरिता गेल्या ११ वर्षांपासून सातत्याने शासन-प्रशासन दरबारी लढा देणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे उपस्थित होते.

## अखेर श्रमजीवीच्या आंदोलनाच्या पवित्रामुळे प्रशासन नमले; बाल वेठबिगारांना मिळाले मुक्ततेचे दाखले

दौलावडगाव | प्रतिनिधी



आज श्रमजीवी संघटनेच्या वतीने आष्टी तहसील कार्यालय समोर श्रमजीवी संघटनेचे पदाधिकारी व सेवालाल गहू खेल तांड्यावरील मुक्त झालेल्या वेठबिगारांनी त्यांच्या मुलांना वेठ वेठबगार मुक्तीचे दाखले मिळावे या साठी आष्टी तहसील कार्यालयाकडे मागणी केली असता तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांनी मला वरिष्ठांचा आदेश हवा आहे असे सांगून मुक्तीचे दाखले देण्यास नकार दिला तर उपविभागीय अधिकारी शेख मॅडम यांनी हा अधिकार माझा आहे.

मीच मुक्तीचे दाखले देऊ शकते असा गजब शोध लाऊन वेठबिगारांना वेठीस धरले. यावरून श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा आदिवासी क्षेत्र आढावा समितीचे अध्यक्ष श्री विवेक भाऊ पंडित मंत्री दर्जा महाराष्ट्र शासन यांनी प्रांत अधिकारी यांना कायदा शिकवुन राज्यात मुक्त झालेल्या वेठबिगारांचे दाखल्यांचे पुरावेच दिले कायद्यात तरतूद असतानाही मुक्तीचे दाखले कोणी द्यायचे या या वादात प्रशासन गुंतले असताना श्रमजीवी संघटनेचे पदाधिकारी व सेवालाल गहूखेल तांडा येथील मुक्त झालेल्या आदिवासी आदिम वेठबिगारांनी तहसीलदार कार्यालयात घुसून घोषणा दिल्या व आंदोलन करून ठिय्या मांडून बसले चार तास ठिय्या मांडून बसल्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी आष्टी तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांना मुक्तीचे दाखले देण्यासाठी प्राधिकृत केले. उपविभागीय अधिकारी श्रीम शेख यांना विवेक भाऊ पंडित यांनी वेठबिगार कायदा शिकवल्याने त्यांनी हा निर्णय घेण्यात आला. गेल्या चार तास चाललेल्या या आंदोलनात श्रमजीवी संघटनेचे सरचिटणीस श्री बाळाराम भोईर, ॲड. प्रभोधन निकाळजे, राजेश चन्ने, दशरथ भालके, रुपेश डोळे, संजय शिंदे, स्वप्निल वाघ, रमेश वाघमारे, सुनील वाघ, रतिलाल मेढा, गोकुल हिलम इत्यादी कार्यकर्त्यांसह मुक्त वेठबिगार यानी जोरदार गाणी घोषणाबाजी करून तहसील कार्यालय दणाणून सोडले. अखेर तहसीलदार वैशाली पाटील यांनी दाखले दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी आंदोलनकर्ते यांच्यामध्ये आनंद पाहायला मिळाला.

## शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर यांचा वाढदिवस साजरा

शिरूर कासार | प्रतिनिधी



खरंतर सरपंच माझ्या आयुष्यामध्ये येऊन अगदी काही दिवस झाले आहेत पण मला या माणसाकडून एक विश्वास भेटला धाडस भेटलं खंबीरपणे साथ भेटली राजकारण करत असताना आजिनाथ कुंडलिक खेडकर या नावांमधून माझ्या राजकीय आयुष्याची एक नवीन सुरुवात झाली खर तर माणसातला देव माणूस जर समजा बघायचं ठरलं तर मी या माणसांमध्ये बघितला आणि तो मला भेटला शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ते अँटी करप्शन ब्युरो चे जिल्हाध्यक्ष तथा घाटशीळपारगावचे माजी सरपंच आणि उद्याचे भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणजेच आजिनाथ भाऊ कुंडलिक खेडकर कालचा वाढदिवस पाहता माणुसकीचं एक जित जागत उदाहरण म्हणजेच आजिनाथ भाऊंचा कालचा वाढदिवस प्रत्येक मित्रांनी प्रत्येक शेतकरी बांधवांनी मजुरांसह कष्टकऱ्यांपर्यंत हा वाढदिवस पोहोचला आणि या वाढदिवसाच्या सर्वसामान्य कडून शुभेच्छा देखील तेवढ्याच भेटल्या म्हणून या माणसाबद्दल लिहिण्यासारखं खूप आहे बोलण्यासारखं खूप आहे योग्य वेळ आल्यानंतर मी नक्कीच आजिनाथ भाऊ बद्दल बोलेल तूर्तास माझ्या कुटुंबाकडून माझ्या सर्व सग्या सोयऱ्या सह मित्र कंपनीकडून नात्यांकडून ग्रुप ग्रामपंचायत जाटनांदूर कडून उखळवाडी गावाकडून शिवसेना आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाच्या वतीने आजिनाथ भाऊंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

### गेवराई तालुक्यातील १३९ ग्रामपंचायतींसाठी सरपंच पदांचे आरक्षण जाहीर

## ७१ ठिकाणी महिला नेतृत्वाला मिळणार संधी; महिलाराज म्हणून काम करणार

गेवराई | प्रतिनिधी




येणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकांसाठी सरपंच पदांचे आरक्षण मंगळवारी गेवराई तहसील कार्यालयात जाहीर करण्यात आले. तालुक्यातील १३९ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांसाठी ही आरक्षण प्रक्रिया पार पडली असून त्यानुसार विविध प्रवर्गानुसार आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये ८३ ग्रामपंचायतींचे सरपंच पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुला ठेवण्यात आले आहे, त्यापैकी ४२ पदे सर्वसाधारण महिलांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. ही संख्या तालुक्यातील महिला नेतृत्वासाठी एक मोठी संधी निर्माण करणारी ठरणार आहे.

त्याचबरोबर ३७ सरपंच पदे नागरिकांचा मागास प्रवर्ग राखीव ठेवण्यात आली असून यातील १९ पदे मागासवर्गीय महिलांसाठी आरक्षित करण्यात आली आहेत. यामुळे सामाजिक समावेशाला चालना मिळणार आहे. अनुसूचित जातींसाठी एकूण १७ सरपंच पदे राखीव ठेवण्यात आली असून त्यामध्ये ९ पदे अनुसूचित जातीतील महिलांसाठी राखीव करण्यात आली आहेत.

कोळगाव ग्रामपंचायतीचे सरपंचपद अनुसूचित जमातीसाठी, तर सुशी वडगाव ग्रामपंचायतीचे पद अनुसूचित जमातीतील महिलेसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. ही आरक्षण प्रक्रिया शासनाच्या नियमांनुसार आणि पारदर्शक पद्धतीने तहसील कार्यालयात पार पडली. यावेळी तहसीलदार संदीप खोमणे, नायब तहसीलदार संजय सोनवणे यांच्या उपस्थितीत संबंधित ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींसह राजकीय व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमदार विजयसिंह पंडीत यांच्या प्रयत्नाने कट चिंचोली गावात तीस वर्षानंतर एसटी बस चालू

### गावकऱ्यात आनंदाचे वातावरण, बस चालक, वाहक यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार

तलवाडा | प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील गेवराई ते कटचिंचोली गावी लालपरिचे आगमन झाले. तब्बल ३० वर्षानंतर गेवराई ते कटचिंचोली बस सेवा बंद होती, कटचिंचोली ते दैठण रस्त्याची दुरवस्था झालेली होती. कटचिंचोली येथे सातवी पर्यंत शाळा आहे. सातवी पासून पुढे ४ कि.मी. दैठण या गावी शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पायी चालत जावे लागत असे रस्ता खराब असल्याने कोणतेही वाहन सरासरी येत जात नव्हते.

परंतु या वर्षी दैठण ते कटचिंचोली या रस्त्याचे डांबरीकरण झाले. गावातील सरपंच रविंद्र निवारे व उपसरपंच ज्ञानेश्वर कोकणे यांनी गेवराईचे आमदार मा.विजयसिंह पंडित यांची भेट घेऊन ग्रामपंचायत प्रस्ताव, अर्ज गेवराई ते कटचिंचोली बस सेवा शाळेसाठी चालू करावी आसे निवेदन आमदार मा विजयसिंह पंडित साहेब यांना द्याण्यात आले. आणि आमदार याचं शिफारस आणि कटचिंचोली ग्रामपंचायत चा प्रस्ताव बसस्थानक प्रमुख यांना द्याण्यात आले.

आगार प्रमुख यांनी प्रास्तावचा विचार करून शाळेच्या मुला, मुलींना शाळेसाठी बस सेवा आज दि.१५ जुलै मंगळवार रोजी सुरू करण्यात आली. गेवराई ते कटचिंचोली बस (लालपरीचा) वेळ सकाळी कटचिंचोली येथे सकाळी ८ वाजता आहे व सायंकाळची वेळ ४ वाजता आहे. परंतु सकाळ चा वेळ सकाळी ९ वाजता कटचिंचोली येथे पाहिजे असं शाळकरी विद्यार्थ्यांचं व गावातील नागरिकांचं म्हनं आहे. बस (लालपरी) सकाळी कटचिंचोली येथे आली आस्था गावातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले. बसचालक व कंडक्टर यांच शाल, श्रीफळ, हार घालून स्वागत केले. बसला पन श्रीफळ फोडून हार घालून श्री लिंबाजीराव पवार यांनी स्वागत केले. तब्बल ३० वर्षानंतर कटचिंचोली चे सरपंच 'रविंद्र निवारे' यांनी आमदार मा.विजयसिंह पंडित साहेब यांना भेटून बस सेवा सुरु केल्या बद्दल गावकऱ्यांनी व शाळेतील विद्यार्थ्यांनी सरपंच यांचे आभार मानले.

बसच्या सांगता साठी गावचे सरपंच रविंद्र निवारे, उपसरपंच ज्ञानेश्वर कोकणे, ह.भ.प.महाराज डॉ.तुळशीराम (अण्णा) खोटे, लिंबाजी पवार, पत्रकार मारोती गाडगे, सोपान कोकणे द्वारकादास कोकणे, मधुकर औटी, प्रदीप भाले, ग्रामपंचायत सदस्य सुनिल अंगरखे, संतोष भुत्कर, सचिन खोटे, सुंदर औटी, भारत येवले, शिवाजी शिंदे, राहुल पर्हाड, सुंदर अंकुश आसे अनेक गावांतील मंडळी उपस्थित होती.

# विमानतळासाठी करोडो रुपये पण रमाई आवास योजनेसाठी काय? गोरगरिबांच्या घराच काय?

■ रमाई आवास घरकुल योजनेचा निधी इतरत्र वळविला? ■ पालकमंत्री अजित पवारांचे याकडे दुर्लक्ष? ■ समाजकल्याण मंत्री संजय सिरसाट यांनी अचानक तोंड बंद का केले यावर का बोलत नाहीत? ■ ६००० घरकुलांचे प्रस्ताव निधी अभावी धुळखात पडून

माजलगाव | प्रतिनिधी
महाराष्ट्रात सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून दुर्बल घटकांसाठी चालवण्यात येणाऱ्या रमाई आवास घरकुल योजनेत गंभीर अडथळे येत असल्याचे दिसून येत आहे. मागील काही काळापासून या योजनेच्या रकमेतील निधी समाजकल्याण खात्यावरून इतरत्र वळवण्यात आल्यामुळे तब्बल ६००० घरकुल पेंडिंग असल्याचा गंभीर आरोप समोर येत आहे. विशेष म्हणजे या धोरणात्मक घडामोडींवर बीडचे पालकमंत्री अजित पवारांकडून आवश्यक ती लक्षवेधी किंवा तातडीची कारवाई न झाल्याने प्रश्न अधिकच गंभीर होत असल्याचा संताप देखील व्यक्त केला जात आहे.

**योजनेची गरज आणि सद्यस्थिती**

रमाई आवास घरकुल योजना हा अत्यंत गरजू घटकांसाठी घरकुल पुरवण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घर बांधकामासाठी अनुदान दिले जाते, ज्यामध्ये उत्पन्न मर्यादा आणि सामाजिक निकषांचे काटेकोर पालन केलं जातं. मात्र, सद्यपरिस्थितीत निधीचा योग्य प्रकारे वाटप न होण्याने ६००० पेक्षा जास्त घरकुलांचे प्रकल्प अडकल्याने सामाजिक व आर्थिक मदतीची गरज असलेल्या लाखो कुटुंबांना मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.





**निधी वळवण्याचा आरोप आणि पालकमंत्र्यांचे दुर्लक्ष**

समाजकल्याण खात्याच्या निधीचे काही भाग प्रशासनाच्या धोरणांनुसार इतर क्षेत्रांत वळवले गेले असून, यामुळे रमाई आवास योजनेच्या निधीमध्ये तुटवडा निर्माण झाल्याचे स्पष्ट आहे. मात्र, या गंभीर समस्येकडे राज्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दुर्लक्ष केल्याने योजना वेळेत पूर्ण होण्याच्या शक्यता धोक्यात आल्या आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि योजनेच्या लाभार्थ्यांनी या याविरुद्ध करत सरकारकडून तातडीची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**अर्थसाहाय्य व नियमावली**

रमाई घरकुल योजनेत लाभार्थ्यांना १.२० लाखांपर्यंत आर्थिक मदत देण्यात येते, ज्यामध्ये ग्रामीण भागातील गरजू, अपंग, अनुसूचित जातींचे लाभार्थी व बारकाईने निवडलेले नागरिक यांचा समावेश आहे. परंतु, जागा उपलब्ध नसल्यास तशी मदत खरेदीसाठी देखील सरकारकडून काही प्रमाणात पुढाकार घेण्यात आला आहे, परंतु या उपक्रमांवरही अद्याप अपेक्षित गती नाही.

**समाजावर होणारा परिणाम**

या योजनांच्या अडथळ्यांमुळे गरीब आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना घरकुल मिळविणे कठीण होत आहे. यामुळे या वर्गातील लोकांच्या जीवनमानात सुधारणा करण्याच्या राज्य सरकारच्या उद्दिष्टाला मोठा धक्का बसू शकतो. तसेच, गरजूंच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी राज्याची बांधिलकी वाखाणण्याजोगी असावी, परंतु सद्यस्थितीत निधीबाबतचे व्यवस्थापन आणि पालकमंत्र्यांचे दुर्लक्ष यामुळे त्या प्रतिमेला मोठा घाला लागल्याचा आरोप आहे.

या पार्श्वभूमीवर, सामाजिक न्याय आणि विकासासाठी काम करणाऱ्या विविध संघटनांनी योजनेतील निधी पुनर्प्राप्ती आणि तेथील विलंब दूर करण्यासाठी तातडीने खुलासा देण्याची मागणी केली आहे. तसेच, पालकमंत्री अजित पवार यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून योजनेच्या मंजुरी प्रक्रियेची वेगात प्रगती करावी, तसेच निधीचे योग्य वाटप सुनिश्चित करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# मायमाऊल्याचा पुढाकार : पांगरी तांडा व पांगरी कॅम्पच्या महिलांचा दारूबंदीसाठी एल्गार

## दारूबंदीसाठी महिलांचा पुढाकार; गावातील अवैध दारू अड्डे केले उद्ध्वस्त

परळी वैजनाथ | प्रतिनिधी
परळी ते बीड रोड वरील पांगरी तांडा व पांगरी कॅम्प येथे दारूबंदीसाठी महिलांचा पुढाकार घेतला असून स्वत: दारूचे अवैध अड्डे उध्वस्त केले आहेत. स्वत: दारू पकडून देण्याचे पाऊल आता महिलांनी उचलले आहे. यासाठी परळी ग्रामीण पोलिस व पांगरी गावचे पोलिस पाटील यांच्या मदतीने कारवाई केली. दारूमुळे संसारात कलह निर्माण होत आहेत तसेच दारूड्यांमुळे किरकोळ भांडणेही होतात. परिणामी, गावाच्या शांततेला बाधा पोहोचत आहे. या कटकटीतून एकदाची सुटका घेण्यासाठी गावातील महिला एकत्र आल्या आणि दारूबंदीचा एकमुखाने निर्णय घेतला. पोलिसांनी दारूबंदीसाठी सकारात्मक सहकार्य करावे, अशी विनवणी महिलांनी केली आहे. परळी वैजनाथ ते बीड राज्य मार्गावरील पांगरी तांडा ते पांगरी कॅम्प येथील गावातील महिलांनी दारूबंदीसाठी बुधवार दि. १६ जुलै रोजी एकत्र येत पुढाकार घेत गावातील अवैध दारू अड्डु उध्वस्त केले आहेत. यासाठी परळी ग्रामीण पोलिस व गावातील पोलिस पाटील यांच्या मदतीने कारवाई केली आहे. पोलिसांनी याबाबत दोन जनावर कारवाई केली आहे. पांगरी तांडा व पांगरी कॅम्प येथे अवैध दारूविक्री मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.गावातील युवकांसह ग्रामस्थ व्यसनाधीन होऊ लागले आहेत. दारूमुळे घराघरात वितुष्ट निर्माण होऊन भांडण-तंटे वाढले आहेत. तळीरामांकडून महिलांना मारझोड होत असून अनेक संसार उद्ध्वस्त होत आहेत. महिलांना त्रास वाढत असून मुलांचे शिक्षण, आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. त्यामुळे दारूबंदीवर आळा घालावा अशी मागणी पोलिसांकडे केली आहे. महिलांनी दारूविक्रीला आळा घालण्यासाठी पुढाकार घेतला असून गावातील दारूविक्री पूर्णपणे बंद करावी यासाठी एल्गार पुकारत थेट विक्री करणारे व दारू अड्डे उध्वस्त केले आहे. परळी ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस कर्मचारी पाडूरंग टोले, पोलिस कर्मचारी महादेव वाघमारे, पोलिस पाटील ज्ञानोबा (माऊली) मुंडे, माजी उपसरपंच श्रीनिवास मुंडे, गोविंद मुंडे, बिभीषण गित्ते व गावातील महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थितीत कारवाई केली.





# शंभर निराधारांना किराणा साहित्याचे वाटप

## दात्यांच्या अर्थसहाय्यातून मानवलोकचा उपक्रम

अंबाजोगाई | प्रतिनिधी
समाजातील दात्यांच्या अर्थ साहाय्यातुन शंभर वृध्द निराधारांना मान्यवरांच्या हस्ते किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बागझरीचे सरपंच प्रशांत दहिफळे, पत्रकार राहूल देशपांडे, रामकृष्ण गो शाळेचे संचालक संतोष गिरी, अरुण आसरडोहकर आदी उपस्थित होते. प्रशांत दहिफळे म्हणाले की, हाल अपेष्टात जीवन जगत असताना अनेक संकटांशी सामना करावा लागतो प्रामुख्याने रोजी रोटीचा प्रश्न गंभीर असून याच प्रश्नासाठी मानवलोक संस्थेच्या माध्यमातून समाजातील दानशुर व्यक्ति मदत करतात. राहूल देशपांडे म्हणाले की, दानशुरांनी केलेल्या मदतीच्या माध्यमातून सर्वांना महिन्याला किराणा साहित्य वाटप होते आणि त्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न सुटतो. दानशूर व्यक्तींच्या अर्थ साहाय्यातुन वृध्द, अपंग, अंध, निराधार आजारग्रस्त उपेक्षितांसाठी मानवलोक सेवाभावी संस्था कार्य करत असल्याचे प्रास्तविकातून शाम सरवदे यांनी सांगितले. सुरुवातीला संजना आपेट, सावित्री सागरे यांनी स्वागतगीत गायिले.

# गावठाण डीपीसाठी अ‍ॅड. सुरेश हाते यांचे शनिवारी रास्ता रोको आंदोलन



तलवाडा | प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी गेल्या दोन ते चार महिन्यापासून विजेचा प्रश्न खूप गंभीर बनला असून ट्रान्सफॉर्म वारंवार जळत असल्यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत असून मातंग वस्ती येथील गेल्या दोन महिन्यापासून ट्रान्सफॉर्म जळाला असल्यामुळे गावातील इतर जागेवरील राहिलेले ट्रान्सफर व केबल तात्काळ बसवण्यात यावा असे निवेदन सहाय्यक अभियंता एम एस सी बी बोर्ड गेवराई यांना माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश हट्टे यांनी दिले असून तात्काळ ही कामे न झाल्यास दि.१९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी रास्ता रोको चा इशारा देण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा हे गाव तब्बल वीस हजार लोकसंख्येचे गाव असून सहा महिन्यापासून गावामध्ये लाईटची दुरवस्था झालेली आहे. गावातील काही ट्रान्सफॉर्म दोन महिन्यापासून जळालेले असून मातंग वस्ती येथील लोकांना तसेच गावातील काही ठिकाणी लोकांना अंधारात राहावे लागत असून अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मातंग वस्ती घेतील डीपी वरती ६० ते ७० कनेक्शन तेथील लोक कनेक्शन घेण्यास तयार आहेत.

ज्या ठिकाणी जळालेल्या अवस्थेत आहेत त्याचा सर्व भार पोलीस स्टेशन समोरून डीपीवर आला आहे. त्यामुळे तोही ट्रान्सफॉर्म जाळण्याच्या स्थितीत आहेत तरी संबंधित विभागाने मातंग वस्ती तसेच राहिलेल्या इतर जागेवर ट्रान्सफॉर्म व केबल तात्काळ बसवण्यात यावे नसता येत्या शनिवारी १९ ७ २०१५ रोजी सकाळी ११ वाजता तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी रास्ता रोको करण्यात येईल असा इशारा माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश हत्ते यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# सुनिता गीते यांनी आत्मदहन करून घेतल्यास मुलास नोकरीवर रुजू करून घेणार का?

## समाज कल्याण प्रदेश उपसंचालक यांच्या आदेशाला बीड येथील अधिकाऱ्यांकडून केराची टोपली

बीड, परळी | प्रतिनिधी
श्रीनाथ गोविंद गित्ते हे प्राथमिक आश्रमशाळा वसंतनगर, ता.परळी (वै.), जि.बीड या शाळेत मा. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक विभाग) छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश दि.०३/०७/२०२५ नुसार शाळेवर रूजू होण्यासाठी वारंवार जाऊन देखी रूजू करून घेतलेले नाही. आश्रम शाळा व्यवस्थापन व समाज कल्याण बीड मधील अधिकाऱ्याला भ्रष्टाचारणे एवढे बरबटले आहेत. त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आदेशाचं देणे घेणे नाही असंच दिसत आहे व त्यांनी त्याला केराची टोपली दाखवली आहे. आर्थिक व्यवहार, घेवान घेवाण केला तरच नोकरी वर रुजू करून घेऊ अशी भाषा आश्रम शाळा व्यवस्थापन समाज कल्याण येथील अधिकारी यांच्यावर आरोप करण्यात आला आहे.



पतीच्या निधनानंतर अनुकंपावर घरातील कुठलाही व्यक्ती घेतला जातो प्रचंड संघर्ष करून स्वत: सुनिता गीते यांनी वरिष्ठ कारल्याच्या पायऱ्या झिजवल्या, वरिष्ठांनी रुजू करून देण्याचे आदेशही दिले. मात्र बीड येथे भ्रष्टाचाराची कीड खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यांच्या मुलास अद्याप नोकरी वरती रुजू करून घेतला नाही. त्या स्वत: कर्करोगाने त्रस्त असुन उपचारासाठी आर्थिक अडचण आहे. मागील अनेक वर्षापासुन पाठपुरावा करून माझ्या मुलाला अनुकंपावर नियुक्ती आदेश मिळालेला असुन देखील संबंधीत शाळा रुजू करून घेण्यास मनाई करत आहेत. संबंधीत शाळेवर अथवा बीड जिल्हयात कोणत्याही शाळेत अथवा कार्यालयात माझ्या मुलाला दि.२१/०७/२०२५ पर्यंत रुजु करून न घेतल्यास आपल्या कार्यालयासमोर दि.२३/०७/२०२५ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे या सर्व गोष्टीस शासन व आपले कार्यालय जबाबदार राहील. आर्थिक, माणसिक, शारीरिक परिस्थिती आणि मनस्थिती ढासळली आहे. सन २०१६ पासुन ते आज पर्यंत वारंवार बीड, संभाजीनगर, पुणे, मुंबई या या ठिकाणी चकरा मारून अक्षरश: हातबल व थकले आहेत, मुलाला नोकरीवर रुजू करून घ्या या मागणीसाठी त्या २३ जुलै २५ रोजी बीड येथील कार्यालयाबाहेर आत्मदहन करणार आहे. अशा स्वरूपाचे लेखी निवेदन त्यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व समाज कल्याण कार्यालय बीड येथे दिले आहे.

# माजलगाव तालुक्यातील ९१ ग्रा.पं. च्या सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

माजलगाव | प्रतिनिधी
आगामी ग्रामपंचायत दृष्टीने २०२५-२०३० या पाच वर्षासाठी तालुक्यातील ९१ ग्रामपंचायतींचे सरपंचपदाचे आरक्षण मंगळवारी येथील तहसील कार्यालयात जाहीर करण्यात आले. यामध्ये विविध प्रवर्गातून ४६ महिलांना गावचा कारभार हाकण्याची संधी उपलब्ध झाली आहे. मंगळवारी तहसील कार्यालयात तहसीलदार संतोष रूईकर, गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक, निवडणूक विभागाचे शिंदे यांच्या उपस्थितीत खालीलप्रमाणे सरपंचपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. सर्वसाधारण : सुर्डी नजीक, सादोळा,नागडगाव, पिंपळगाव नाखले, हिवरा (बु.), आनंदगाव, जदीद जवळा, सोन्नाथडी, खेर्डा खुर्द, साळेगांव, निपाणी टाकळी, उमरी (बु.), तालखेड, महातपुरी, डुब्बामजरा, बाराभाई तांडा, भाटवडगाव, बेलुरा. सर्वसाधारण महिला : चोपनवाडी, नित्रुड, एकदरा, धनगरवाडी/पायतळवाडी, गुंजथडी, किट्टी आडगाव, देपेगांव, खरात आडगांव, ढोरगाव, नाकलगाव, मालीपारगाव, लवुळ, वारोळा, सावरगाव, बाभळगाव, लोणगाव, पिंपरी खुर्द, राजेगाव, हरकी निमगाव, टाळेवाडी, मंजरथ, मंगरूळ, टाकरवण, काळेगावथडी, चिंचगव्हाण. अनुसूचित जमाती महिला : शिंपे टाकळी अनुसुचित जाती : रामपिंपळगाव,शृंगारवाडी, गव्हाणथडी सरवर पिंपळगाव, शेलापुरी, कोथरूळ, शिंदेवाडी पात्रुड. अनुसूचित जाती महिला पुनंदगांव, ब्रह्मगाव, मनूर, रोषणपुरी, शुक्लतीर्थ लिमगाव, सुरुमगाव, पुरुषोत्तमपुरी, खानापुर. ना.मा.प्र. : मनुरवाडी, शहापूर मजरा, गोविंदवाडी, छत्रबोरगाव, आबेगाव, शिंदेवाडी (वां.), गोविंदपूर, खतगव्हाण, सोमठाणा, केसापुरी, लुखेगाव, वांगी (बु.), छोटेवाडी ना.मा.प्र.महिला : गंगामसला,मोठीवाडी, शहाजानपुर, रेणापुरी, सुलतानपूर, सांडस चिंचोली, तेलगाव खुर्द, सिमरी पारगाव, रिधोरी, फुलेपिंपळगाव, पात्रुड, घळाटवाडी. : सर्वसाधारण : दिंद्रुड, मोगरा, राजेवाडी, फुलपिंपळगाव, लहामेवाडी, देवखेडा, वाघोरा.

# प्रवीण गायकवाड यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करत कडक कारवाई करण्याची मागणी

धारूर | प्रतिनिधी
धारूर तालुक्यातील समाज बांधवांच्या वतीने आज धारूर तहसीलदार निळे यांना निवेदन देऊन प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. धारूर येथील समाज बांधवांनी तहसील कार्यालयात जाऊन तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी उपस्थित अनेक कार्यकर्त्यांनी आपला रोष व्यक्त करत प्रवीण गायकवाड हे सतत सामाजिक प्रश्नांवर नेहमी सक्रिय असतात. समाजहिताचे काम करत असताना त्यांच्यावर झालेला हा हल्ला केवळ व्यक्तीवर नसून संपूर्ण समाजावरच आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या घटनांना आळा बसवण्यासाठी संबंधित आरोपींवर त्वरीत आणि कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. यावेळी जर या प्रकरणात तात्काळ कारवाई झाली नाही, तर सरकारविरुद्ध तीव्र आंदोलन करण्यात येईल. समाजातील अन्यायाविरोधात लढणाऱ्या व्यक्तींवर



हल्ला होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन या प्रकरणातील सर्व आरोपींना त्वरित अटक करून कठोरात कठोर करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे यावेळी करण्यात आली. यावेळी बालाजी चव्हाण, विनायक शिनगारे, रमेश नखाते, सुरेश आंडील, सचिन थोरात, सटवा आंडील, तुषार खुळे, विश्वास शिनगारे, राहुल चव्हाण, ऋषिकेश गव्हाणे, भारत चव्हाण, अंकुश कदम, व्यंकटेश साखरे, बालाजी घोडके, परमेश्वर तिडके, मच्छिंद्र तिडके, राहुल नायकोडे, अशोक थोरात आदी समाज बांधव उपस्थित होते.

# अतिक्रमण धारकांनी गाव तलावाच्या भिंती लगट केलेले बांधकाम तलाव फुटण्याचा धोका

## संबधित प्रकरणी विभागिय आयुक्त कार्यालयास स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिले निवेदन

तलवाडा | प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे गावा लगट सरकारी गायरान जमिनी वर अंदाजे १०० ते १०२ एकर क्षेत्रामध्ये विस्तीर्ण अशा स्वरुपात असणाऱ्या पाझर तलावाच्या संरक्षण भिंतीवर कोणत्याही प्रकारचा अधिकार नसताना तलवाडा ग्रामपंचायतच्या तत्कालीन ग्रामसेवक व सरपंचांनी आर्थिक लाभाच्या उद्देशाने गैरव्यवहार करत अतिक्रमण धारकांनी पी टी आर दिल्याने अतिक्रमणधारकाने भिंत कोरून सदर ठिकाणी बांधकाम केल्यामुळे व आज रोजी सुद्धा खोदकाम व बांधकाम सुरु असल्यामुळे गाव तलावास व संपुर्ण गावातील लोकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे तरी हा गैर व्यवहार करणाऱ्या व अतिक्रमण धारकावर योग्य ती कारवाई करण्यात यावी या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने यांनी दिनांक १५/७/२०२५ रोजी उप विभागिय आयुक्त कार्यालय संभाजी नगर यांना निवेदन दिले असुन निवेदनात तक्रार कर्त्यांनी म्हटले आहे की तलवाडा तालुका गेवराई जिल्हा बीड, ग्रामपंचायत हद्दीतील गावाच्या पश्चिमेस असणाऱ्या सरकारी गायरान जमिनीमध्ये अंदाजे १०० एकर क्षेत्रावर विस्तीर्ण अशा स्वरूपात पाझर तलाव आहे. सदर पाझर तलावाचे खोलीकरणाचे काम सन २००१२-१३ मध्ये ख्रिसलेस फाऊंडेशन पुणे, व अखिल भारतीय जैन संघटना यांच्यामार्फत तलावातील साचलेला गाळ शेतकऱ्यांच्या शेतात मोफत पुरवठा व्हावा या उद्देश्याने या तलावाच्या खोलीकरणाचे काम



तत्कालीन माननीय विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले आहे.

विशेष बाब म्हणजे त्याच तलावाच्या संरक्षण भिंतीवरचे पिटीआर ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा यांनी दिलेले आहेत. तलावाची भिंत कोरून त्या ठिकाणी आज रोजी सुद्धा अतिक्रमण धारक बेसमेंट बांधकाम करू लागलेले आहेत व काही जणांनी पक्क्या स्वरुपातील बांधकाम केलेले आहे. मा. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, भविष्यात तलावात पाणीसाठा जास्त झाल्यास कोरल्या जाणाऱ्या संरक्षण भिंतीच्या ठिकाणी तलावाची संरक्षण भिंत फुटण्याची शक्यता नाकारताच येत नाही.

तरी हा भविष्यातील संभाव्य धोका व ग्रामस्थांची जीवित हानी व वित्त हानी टाळण्यासाठी आज रोजीच योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनाच्या शेवटी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने यांनी केली आहे. सदर प्रकरणी काही ग्रामस्थांनी स्थानीय अधिकाऱ्याकडे वारंवार तक्रारी अर्ज केलेले आहेत. एवढेच काय, काही ग्रामपंचायत सदस्यांनी सुद्धा सदर गैरव्यवहार प्रकरणा विरोधात अमरण उपोषण सुद्धा केलेले आहे. परंतु आजपर्यंत कुठल्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेत सदर गैर व्यवहार करणाऱ्या वर कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. तरी सदर प्रकरणी नम्र विनंती करण्यात येते की हा गैरव्यवहार करणाऱ्या वर योग्य ती कडक कार्यवाही करण्यात यावी, आस्या प्रकारची मागणी निवेदनाच्या शेवटी करण्यात आली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT